प्रकरण चौथे

# ‘मोचनगड’ कादंबरीची प्रेरणा व स्वरूप

प्रकरण ४ थे

# 'मोचनगड' कादंबरीची प्रेरणा व स्वरुप'

जीवनाचे काल्पनिक चित्र आकर्षक रीतीने मांडणे हेच कादंबरीकाराचे ध्येय व कार्य होय. साहजिकच या चित्रांकरिता सभोवतालची सृष्टी ही साधनसामग्री सदैव त्याच्या हाताशी असते व त्याआधारे कधी तो कल्पनारम्य तर कधी प्रत्यक्ष परिस्थितीचे भेसूर चित्र चितारतो. ऐतिहासिक कादंबरीचा कालखंड मर्यादित असल्याने व विशिष्ट कालाच्या जीवनाशी त्या निगडीत असल्याने त्यांची लोकप्रियता मर्यादितच राहणार असा युक्तीवाद क्वचित ऐकण्यात येतो, पण तो बरोबर नाही. ऐतिहासिक कादंबरीत ऐतिहासिक घटनांबरोबरच कल्पकतेला वाव अधिक असतो व संभाव्यतेवर भर अधिक दिला जातो. तसेच ऐतिहासिक कादंबरीचा लेखक जरी ऐतिहासिक व्यक्तिंची चित्रे चितारीत असला तरी इतर लेखकांप्रमाणेच या व्यक्तिचे स्वभावचित्रण समिष्टीरूपाने मानवी स्वभावाचे नमुने या दृष्टीनेच केले जाते. वाचकही या कादंबऱ्यांकडे आकर्षित होतो तो ही चित्रे मानवी मनोरचनेची उदाहरणे असतात म्हणूनच व मानवी जीवनाचे अधिक ज्ञान करून घेण्यासाठीच 'मोचनगड' या ऐतिहासिक कांदबरीच्या लेखनामागील प्रेरणांचा विचार करता आपणाला खालील तीन प्रेरणांचा विचार करावा लागेल.

## १) राष्ट्राभिमान जागृत करणे :-

मराठीत आरंभीच्या काळातही काही ऐतिहासिक कादंबऱ्या लिहल्या गेलेल्या दिसतात. अशा प्रकारच्या लेखनामागची प्रेरणा दोन-तीन प्रकारची होती. खरा नितीबोध किंवा उपदेश ऐतिहासिक कथानकातून साधता येण्याजोगा होता. परकिय राज्य कितीही चांगले असले तरी त्यात स्वराज्याची प्रतिष्ठा नाही. येथील राष्ट्रीयत्वाची भावना जागृत व्हायला पाहिजे. अशी एक सुक्ष्म कल्पना या काळात रुजलेली दिसते. मानवी मनास जे अद्‌भूताचे, कल्पनारम्यतेचे वेड स्वभावत:व असते. त्याचे दर्शन वा पोषण ऐतिहासिक कथा-कादंबऱ्यातून होण्यासारखे असल्याने काही कादंबरीकार ऐतिहासिक व्यक्तीच्या व घटनांच्या शोधात राहीले[१]. काल्पनिक सृष्टीतील सद्‌गुणांच्या व रूपसंपदेच्या पुतळ्यांपेक्षा ऐतिहासिक वीरपुरूष वा वीरकन्या वाचकांना अधिक जवळची वाटण्याचा संभव होता.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY ★ KOLHAPUR

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजी राजवटीने व इंग्रजी साहित्याने घातलेली भुरळ कमी होऊ लागली. पारतंत्र्याच्या कल्पनेने अनेक लोक अस्वस्थ होऊ लागले. सुशिक्षितांपैकी काही लोक अंतर्मुख होऊन आपल्या देशाच्या व समाजाच्या अवनितीबद्दल विचार करु लागले. हिंदूस्थातनच्या इतिहासाविषयी व परंपरेविषयी अभिमान जागृत होऊ लागला. अशावेळी जनतेमधील मरगळ झटकून टाकण्यासाठी व जनतेला साहित्याच्या माध्यमातून आपल्या देशाची परंपरा व इतिहास समजावून देण्यासाठी अनेकांनी आपली लेखणी सरसावली. आपल्या पुर्वजांच्या पराक्रमाची ओळख करून देऊन लोकांच्यात अन्यायाविरुद्ध चीड निर्माण करणे हे साहित्यिकांचे कर्तव्य आहे. ही भावना रूजू लागली. कपोलकल्पित, अतिरंजित अद्भूत कादंबऱ्यातून फार तर मनोरंजनाचे कार्य होईल पण जनजागृतीचे काम होणार नाही. याची खात्री पटली अन् त्यातूनच ऐतिहासिक कादंबरीचा जन्म झाला. इतिहासातील पराक्रमी पुरूषांच्या शौर्यकथेवर आपल्या शैलीचा बाज चढवून लिहलेल्या या कादंबऱ्या लोकप्रिय न झाल्या तरच नवल. अन् ही तशी काळाची गरजच होती. इतिहासातील बीजे घेऊन ती फुलविणे, जनतेचा राष्ट्राभिमान जागृत करणे, इतिहासाची ओळख नवीन पिढीला करून देणे या हेतूने प्रारंभीच्या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहल्या गेल्या. राष्ट्राची व समाजाची गरज लक्षात घेऊन गुंजीकरांनी १८७१ मध्ये शिवकालाच्या पार्श्वभूमीवर लिहलेली पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली. 'मोचनगड' पाठोपाठ नागेश बापटांनी 'चितुरगढचा वेढा', 'पानिपतची मोहिम' या कादंबऱ्या लिहल्या. तर आपटेंनी 'पुतळाबाई' ही कादंबरी लिहली. या सर्व कादंबऱ्या राष्ट्राभिमान जागृत करणे या हेतूने लिहल्याचे आपणाला 'जुनावाडा' या कादंबरीच्या प्रस्तावनेवरूनच समजेल. प्रस्तावनेत लेखक म्हणतो,'हा ग्रंथ वाचून वाचकाच्या मनात थोडा जरी राष्ट्राभिमान उत्पन्न झाला तरी ग्रंथकर्त्याच्या श्रमाचे चीज होईल' यावरून या कादंबरीलेखनामागील हेतू आपल्या लक्षात येतो. गुंजीकरांनी ऐतिहासिक महत्कथेचा आदर्श आमच्यासमोर ठेवलेला नाही. त्याचे कारण असे आहे की त्यांना इतिहासाचेच आधी शुद्धिकरण करून खरा इतिहास लिहावयाचा होता. त्याकरिता त्यांनी विविध ज्ञानविस्ताराच्या ऑक्टोबर १८७१ च्या अंकापासून 'सर्व लोकांस विनंती' या मथळ्याखाली मजकूर छापण्यास सुरूवात केली होती. त्यात ते लिहतात,'ज्या देशाचा इतिहास त्या देशाच्या लोकांना माहित नसावा व तो त्यांनी परक्यांकडून समजून घ्यावा ही मोटी लांछनाची गोष्ट आहे. आपल्या पुर्वजांनीही अशा प्रकारच्या इतिहासाला साधने ठेवली नाहीत असे नाही. हिंदूंची कृत्यें तितकी निरूपयोगी' अशा अयोग्य समजुतीत मग्न होऊन त्या अमूल्य लेखांपासून काही लाभ करून घेण्याकडे

दुर्लक्ष करीत आहोत. आणखी अशी भिती वाटते की जर कोणी त्याकडे लवकर लक्ष न दिले तर थोड्याच दिवसात ते लेख अगदी निर्मुलन होऊन जातील. याकरिता ते सर्व मिळून त्या सर्वांच्या साह्याने मराठ्यांचा खरा इतिहास लिहण्याची आमची इच्छा आहे' यावरून गुंजीकरांना देशाबद्दल किती तळमळ होती हेही आपल्या लक्षात येईल.

## २) इतिहासकाळातील जीवनाविषयी आस्था :-

ऐतिहासिक कादंबरी हा अद्‌भूताला व वास्तविकाला सांधणारा एक दुवा असतो असे म्हंटले जाते. 'मुक्तामाला' या कादंबऱ्यांनी तत्कालीन, सुखासीन वाचकांची अद्‌भूताची आवड पुरविली. ऐतिहासिक कादंबऱ्यात अद्‌भूत कादंबऱ्यातील ऐश्वर्यशाली, इच्छापूर्तीप्रधान वातावरण कायम ठेवता येते व शिवाय कथानकात सत्याचा आभास निर्माण करता येतो. ऐतिहासिकतेच्या मुलाम्यामुळे रोमांचकारी घटनांमध्ये अधिक उत्कंठता येते व त्यांना घटिताचे महत्व येते व मनावर वेगळाच परिणाम होतो. लोकादरास पात्र झालेल्या वीर पुरूषांच्या ऐतिहासिक वा काल्पनिक कृतीचे वर्णन ज्यात आहे त्या कथेवर उदात्ताची कळा स्वाभाविकपणे पसरते. पुर्वजांच्या गतवैभवाची आठवण करण्यात एक तऱ्हेची विषादपूर्ण पण गोड आपुलकीही असते व ही भावना निष्क्रीयतेच्या काळात विशेषच प्रिय वाटते. बऱ्याच ऐतिहासिक कादंबऱ्या अशा हेतूने लिहल्या जातात. परंतु अशा आनंदासाठी लिहली जाणारी ऐतिहासिक कादंबरी क्वचितच बावनकशी ठरते. एक प्रकारचा सवंग आनंद देण्याचा हेतु:पूर्वक प्रयत्न तीत केला जातो. अस्सल ऐतिहासिक कादंबरीची निर्मिती अशा तऱ्हेने होत असेल असे वाटत नाही. अद्‌भुताचा रोमांच व सत्याभासाचे समाधान हे तिचे उपपरिणाम असतात. ते हेतुचे स्थान बळकावीत नाहीत. तिची निर्मिती इतिहासकाळातील जीवनाविषयीच्या आस्थेमुळे अभिमानामुळे होत असते[२]. ही अशी आस्था किंवा आपुलकी वाडवडिलांच्या पुण्याईवर सुखासीनपणे अन् निष्क्रियपणे जगणारांना वाटत नाही. भावी काळात काही करण्याच्या आकांक्षेने ज्यांची मने भारली आहेत व जे काही करायचे ते आपल्या पुर्वपरंपरेशी सुसंगत असावे अशी ज्यांना तळमळ वाटत असते त्यांनाच ही आस्था व आपुलकी वाटते. रा. भि. गुंजीकर यांची 'मोचनगड' नामे मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी याच वृत्तीतून निर्माण झाली[३].

इंग्रजी अंमलाच्या सुरूवातीला महाराष्ट्राचे मन निष्प्रभ झाले होते. नव्या आकांक्षाकडे दृष्टी उचलून पाहण्याची शक्ती त्यात राहिली नव्हती व जुन्या आठवणी ज्या शिल्लक होत्या त्या केवळ

निकटच्या काळांतील म्हणजे दुसऱ्या बाजीरावाच्या विलासी व घरबुडव्या काळातीलच होत्या. त्यामुळे या काळाच्या उच्च वर्गाला 'अद्‌भूत कादंबरीच्या वाचनाचा विरंगुळा फार सोयीचा वाटला. परंतु १८६५ ते १८७५ या अद्‌भूत कादंबरीच्या सरशीच्या दशकातच जीवनाची कळा पालटू लागली. सार्वजनिक सभा, पुणे, मुंबई, वक्तृत्वोत्तेजक सभा, प्रार्थना समाज इ. अनेक संस्थांचा पाया घातला गेला. निबंधमालेला प्रारंभ झाला. सद्यकालीन जीवनाविषयी व ऐतिहासिक घटना, व्यक्ति यांच्याविषयी दृष्टीकोन बदलू लागला. ग्रँट डफसारख्या इतिहासकाराशी टक्कर देण्याचे धैर्य व त्याने केलेले मराठी राज्याचे व मराठी शाहीतील व्यक्तिचे वर्णन किती अज्ञानमुलक व असत्य आहे हे ठासून सांगण्याची शक्ती निलकंठराव किर्तने यांच्यासारख्या कॉलेजातील विद्यार्थ्याला देखील प्राप्त झाली. मराठ्यांच्या इतिहासाचे अध्ययन वेगळ्याच रीतीने सुरू झाले. १८७८ मध्ये 'काव्यातिहास संग्रह' जन्माला आला व महाराष्ट्रातील इतिहास संशोधनाला खरा ठसठशीत प्रारंभ झाला.

### ३) इंग्रजी वांङ्‌मय वाचून प्रेरणा मिळाली :-

ऐतिहासिक कादंबरीकारांच्या समोर आदर्श म्हणून स्कॉट व ड्युमा हे दोन लेखक उभे होते. त्यातही ड्यूमापेक्षा स्कॉट त्यांना जवळचा होता. इतकेच नव्हे तर 'मोचनगड' ही स्कॉट च्या एका कादंबरीचे रुपांतर आहे. अशा प्रकारचे विधान त्या काळी कोणीतरी केले होते आणि ते सिद्ध करण्याबद्दल त्याला दंभहारक मासिकामध्ये आव्हानही देण्यात आले होते. पण ते स्विकारले गेल्याचे दिसत नाही. अलीकडे या जुन्या आरोपांचा पुनरुच्चार प्रो. नारायण केशव बेहरे यांनी विविध ज्ञानविस्ताराच्या पन्नाशीच्या आनंदोवत्साचे स्मारक म्हणून प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात (ग्रंथ १ ला, उत्तरार्ध जुलै १९२३ पृष्ठ - १०८) केला आहे. आपल्या 'मराठी कथात्मक वांङ्‌मय' या निबंधात ते लिहतात, 'यानंतर इंग्लिश भाषेतील कादंबऱ्यांची भाषांतरे अगर रूपांतरे मराठीत इतके सुदंर साधले आहे की, त्याची गणना स्वतंत्र पुस्तकात सहज करता येईल. प्रो. बेहऱ्यांनी जर आपल्या विधानाला पुराव्यादाखल मूळ इंग्रजी ग्रंथाचे नाव दिले असते, तर अन्यायाला जागा राहिली नसती. माझ्या माहितीदाखल मोचनगडावरील हा आक्षेप खोटा आहे. श्रीपादकृष्ण कोल्हटकर यांनी 'विविध ज्ञानविस्तारात (पुस्तक ५३, अं. १-२, स. १९१२) 'मराठी कथात्मक वांङ्‌मय' याच मथळ्याखाली जो लेख लिहला होता, तो प्रो. बेहरे यांनी पाहिला नसावा. त्या लेखात कै. कोल्हटकर लिहतात 'या (अद्‌भूत) कादंबऱ्या व प्रस्तुतच्या सामाजिक कादंबऱ्या यामध्ये ऐतिहासिक कादंबऱ्यांची एक पायरी आवश्यक होती व तिला सुरवात गुंजीकरांच्या 'मोचनगड' पासुन (१८७१) झाली व तिची रचना

स्कॉटच्या कादंबऱ्यांच्या धर्तीवर केलेली आहे. आपल्या इकडे ऐतिहासिक कादंबऱ्यांना लागणारी सामग्री इतकी अल्प आहे की, १८ व्या शतकातील चालीरीतीचीही निश्चयात्मक माहिती मिळविण्याची मारामार पडते. मग १७ व्या शतकाची गोष्ट दूरच राहिली.... अशा तुटपुज्या साहित्याच्या बळावर जितकी चांगली कादंबरी लिहता येईल तितकी 'मोचनगड' ही कादंबरी लिहली आहे.....पहिली स्वतंत्र अद्भूत कादंबरी म्हणून 'मुक्तमालेची' व पहिली स्वतंत्र ऐतिहासिक कादंबरी म्हणून 'मोचनगडची' जी योग्यता तीच पहिली व्यावहारिक कादंबरी म्हणून राहाळकृत 'नारायणराव व गोदावरी' हीची आहे.

इंग्रजी वांङ्:मय वाचून गुंजीकर यांना 'मोचनगड' ही कादंबरी लिहण्याला प्रेरणा मिळाली असेल. विशेषत: स्कॉटच्या कादंबऱ्या वाचून प्रेरणा मिळाल्याची शक्यता नाकारता येत नाही. हे जरी खरे असले तरी गुंजीकरांना आपल्या देशाच्या इतिहासात वाटत असलेला 'रस' आणि त्यांची इतिहासाकडे पाहण्याची वेगळी दृष्टी 'मोचनगड' ला लाभलेल्या यशामागे असावी. 'मराठ्यांचा खरा इतिहास' लिहण्याची आमची इच्छा आहे' असे त्यांनी विविधज्ञानविस्ताराच्या आक्टोबर १८७१ च्या अंकात लिहले होते. फ्रान्स देशात ड्युमालाही स्कॉटच्या कादंबऱ्या वाचूनच ऐतिहासिक कादंबऱ्या लिहण्याची स्फूर्ती झाली हे प्रसिद्ध आहे. स्कॉट व ड्यूमा हे दोघेही लेखक पाश्चिमात्य रोमॅंटिसिझमचे पाईक आहेत. ते इतिहासाकडे ऐतिहासिक वास्तवाचा शोध घेण्यासाठी वळलेले नव्हते. वर्तमान वास्तव कंटाळवाणे वाटल्यामुळे त्यापासून कोठेतरी दूर स्वप्नांच्या धुंद वातावरणात स्वत:ला विसरण्याची या लेखकाची प्रकृती होती. पण या प्रकृतीमुळेच गुढ आणि भव्य सौंदर्याचे मन भारून टाकणारे दर्शन होण्याची त्यांना शक्यता होती. अलेक्झांडर ड्यूमाला व स्कॉटला अद्भूतरम्यतेचे जुन्या शिलेदारांचे आकर्षण होते. पण त्यांचीही कादंबरी कथानकप्रधान कादंबरीच होती.

**मोचनगड कादंबरीचे स्वरूप :-**

ऐतिहासिक कादंबरीचे स्वरूप सामाजिक कादंबरीहून थोडे भिन्न असते. ऐतिहासिक कादंबरी ही गतकालीन जीवनावर आधारित असते. तर सामाजिक कादंबरी समकालीन जीवनासंबंधी असते. यावर कदाचित कोणी असा आक्षेप घेतील की, आजच्या घटना शंभर वर्षांनंतर ऐतिहासिक ठरतील व म्हणून आजच्या सामाजिक कादंबऱ्या या उद्या ऐतिहासिक सदरात गणल्या जातील. पण हा युक्तीवाद तर्कसंगत नाही. ऐतिहासिक कादंबरीकार कथेतील घटनांकडे दूरत्वाच्या दृष्टीने पाहत असतो.

इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहण्यायोग्य घटनांबद्दल वाटणाऱ्या अभिमानामुळे असो अथवा इतिहासातील गुढ घटनांचा काल्पनिक अन्वयार्थ लावण्याची इच्छा झाल्यामुळे असो, लेखक ऐतिहासिक कादंबऱ्या लिहण्यास प्रवृत्त होत असेल. पण त्या घटना समकालीन नाहीत याची जाणीव त्याला असल्याने त्याच्या निवेदनात एक प्रकारची दूरत्वदृष्टी ठळकपणे प्रकट होत असते. त्यामुळेच 'जुन्या काळचे वातावरण साकार करण्याचा प्रयत्न ऐतिहासिक कादंबरीत असतो.

ऐतिहासिक कादंबरीत इतिहास व कल्पकता यांचे संमिश्रण कमी अधिक प्रमाणात आपल्याला आढळते[४]. बखरीपेक्षा ऐतिहासिक कादंबरीचे स्वरूप निराळे आहे. बखरीत आधारभूत माहितीच्या भरीला ऐकीव माहितीची अथवा दंतकथांची जोड असते. ऐतिहासिक कादंबरीत लेखकाच्या कल्पकतेला वाव असतो व ज्ञात असलेल्या ऐतिहासिक माहितीला कल्पनाशक्तीने रंजकता दिली जाते. बखरी या इतिहासाच्या साधनस्वरूप असतात. ऐतिहासिक कादंबरीमुळे इतिहासाबद्दल आकर्षण अथवा कतुहल निर्माण झाले तरी इतिहासाच्या ज्ञानात त्यामुळे भर पडत नाही. बखरीला इतिहासाचे प्रारंभिक स्वरूप म्हणता येईल. ऐतिहासिक कादंबरी ही मुळातच एक ललीतकृती असून इतर कादंबऱ्यांपेक्षा ती भिन्न केवळ या अर्थानेच असते की, पार्श्वभूमीसाठी लेखकाने जुना काळ निवडलेला असतो व जुन्या काळचे वातावरण शक्य तितके प्रत्ययकारी करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. ऐतिहासिक कादंबरीत इतिहासप्रसिद्ध व्यक्तींचा व घटनांचा निर्देश असल्याने सत्याचा आभास निर्माण करणे सोपे जात असले तरी लेखकास पदोपदी जाचक ठरणारे असे निर्बंधही पुष्कळच असतात. ते पाळुन उत्तम ऐतिहासिक कादंबरी निर्माण करण्यास फार उच्च दर्जाचेच कौशल्य लागते.

'मोचनगड' ही कादंबरी कोठल्यातरी ठराविक सदरात घालावयाची तर ती ऐतिहासिक या सदरातच घालावी लागेल. तथापि तिच्यात खरा ऐतिहासिक असा भाग थोडा असून काल्पनिक असाच भाग पुष्कळ आहे. ऐतिहासिक ललीत वांङ्‌मयात खऱ्या घडलेल्या इतिहासाचे व काल्पनिक घटनांचे प्रमाण किती असावे हे ठरलेले नाही व ठरविता यणे शक्य नाही. तथापि ऐतिहासिक हे नाव मिळण्याला सुप्रसिद्ध ऐतिहासिक पुरुष किंवा ऐतिहासिक घटना यांवर ते वांङ्‌मय आधारलेले असावे लागते. पण त्यातल्या त्यात ऐतिहासिक नांव अधिक यथार्थपणे लाविता येईल आणि ऐतिहासिक प्रसंग म्हंटले म्हणजे त्याबरोबर इतिहासप्रसिद्ध नावेही ओघाने येतातच. 'मोचनगड' या कादंबरीत खऱ्या ऐतिहासिक अशा घटना नाहीतच परंतु प्रसिद्ध अशी ऐतिहासिक नावेही अगदी शेवटी-शेवटी अल्पप्रमाणात आली आहेत. मोचनगड या नावाचा खरोखर एखादा गड आहे की नाही हेही माहित

नाही. निदान त्या गडाच्या संबंधात या कादंबरीत घटना कोणत्याही इतिहास ग्रंथात वाचलेली नाही. स्वत: ग्रथकारानेच आपल्या लेखनाला 'मोचनगड' नामक 'कल्पित गोष्ट' असेच नांव दिले आहे. ऐतिहासिक हा शब्द वापरलेला नाही. परंतु या कादंबरीला ऐतिहासिक हा पारिभाषिक शब्द लावता आला नाही तरी तिची मुळ भूमिका ऐतिहासिक म्हणता येईल. याचे कारण सर्व कादंबरीभर आपण एका विशिष्ट ऐतिहासिक काळाच्या समाजस्थितीचे चित्र पाहतो असेच वाटते. यातील गणोबा, भगवंतराव, रंगोपंत, बाळोजी, गंगूबाई, जनोबा, सावित्रीबाई इ. नावे आजकालच्या कादंबऱ्यातही आढळू शकतील. तसेच जामगावासारखी गांवेही आज आहेत. तथापि या नामधारी व्यक्तिंनी केलेले म्हणून वर्णिलेले चरित्र आजकालच्या अनुभवात येणारी नाही. यातील कथाभाग अद्‌भूतरसप्रधान आहे. म्हणून याला इंग्रजी भाषेने Romancs हे नांव देता येईल. ही कादंबरी लिहली गेली तेव्हा ललीतवांङ:मय लेखनाचा प्रारंभ होता. म्हणून त्यातील भाषा आजच्या भाषेसारखी नाही. तसे पाहिले तर मोचनगडमध्ये ऐतिहासिक असे फारसे काही नाही आणि तिला ऐतिहासिक कादंबरी म्हणण्याचे बलवत्तर कारणही नाही. आणि शिवाजी महाराज कर्नाटक दिग्विजयाला जाताना त्यांनी मोचनगड जिंकला असा उल्लेख कोठे इतिहासात नाही किंवा आख्यायिकेत, दंतकथेत नाही. पण हे काही मोचनगडला ऐतिहासिक नाही असे म्हणण्याचे खरे कारण नाही. महापंडित राहुल सांकृत्यायन यांच्या 'जय योधेय', 'सिंहसेनापती' या कादंबऱ्या अशाच आहेत. पण त्या ऐतिहासिक नाहीत असे कोणीच म्हणणार नाही. ऐतिहासिक कादंबरी वास्तविक ऐतिहासिक घटना किंवा व्यक्ति यासंबंधी ज्ञान असणाऱ्या सत्याच्या ऐतिहासिक कणांचा स्विकार करील किंवा एखाद्या अख्यायिकेच्या दंतकथेच्या मागे पाठलाग करीत जाईल. किंबहुना सगळीच नावे-गावे काल्पनिक घेईल. त्यावर ऐतिहासिक कादंबरीचे ऐतिहासिकत्व पूर्णतया अवलंबून असत नाही. एक काल्पनिक गड घेऊनही शिवाजीकालीन महाराष्ट्राचे व त्यातील विचारप्रवाहांचे चित्रण करता आल असते. तत्कालिन जीवनाचे दर्शन घेता आले असते. शिवाजीच्या कार्यामुळे भारला जावून मराठ्यांच्या राज्यनिर्मितीला उपकारक होऊ इच्छिणारा एक गट स्वामीनिष्ठेच्या खऱ्या-खोट्या नावाखाली आहे. या अवस्थेला चिकटून राहणारा दुसरा गट आणि आपले राज्य टिकवू इच्छिणारा मुसलमानांचा व राज्यकर्त्यांचा तिसरा गट, असे तीन प्रवाह त्या-त्या जीवनात प्रमुख आहेत. याखेरीज आततायी, स्वार्थी, भित्रे, साहसी असे वेगवेगळे नमुनेही त्या जीवनात असतीलच. समाज, समाजातील अंत:प्रवाह आणि व्यक्ति त्यांच्या जीवनाविषयक श्रद्धा यांच्या परस्पर ताणानिशी ऐतिहासिक समाज व वातावरण रंगविता आले असते. मग पात्रे, प्रसंग आणि मोचनगड काल्पनिक असला तरीही कादंबरी ऐतिहासिक झाली असती.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

ऐतिहासिक कादंबरीत मुख्य घटना, मुख्य पात्रे किंवा काही घटना व काही पात्रे ऐतिहासिक असून चालणार नाही. सामाजिक कादंबरी हा कलेच्या पातळीवर वर्तमान वास्तवाचा शोध असतो. आकलनाचा प्रयत्न असतो. तशी ऐतिहासिक कादंबरी ही ऐतिहासिक वास्तवाच्या कलात्मक आकलनावर आधारलेली असावह लागते.[५] हे आकलन शेवटी वर्तमानकालीन वाचकांसाठी असते. त्यांना ते समाधानकारक वाटावे लागते.

जीवन वास्तव म्हंटले म्हणजे त्या व्यक्ति, परिस्थिती आणि घटना हे तिन्ही धागे येणार. ऐतिहासिक सत्य जर घेतले तरी इतिहास काही घटना पुरवितो. काही स्वभावविशेष नोंदवून देतो. ऐतिहासिक कादंबरी या सत्याच्या कणांना पारखी होत नसते. किंवा तिला पारखे होण्याची गरज नसते. ऐतिहासिक सत्य आपल्या पोटात सामावून घेणारे एकसंघ व्यक्तिमत्व शेवटी कल्पनेच्या जोरावरच सजीव व साकार करता येते. तो समाज, त्या व्यक्ति, तो काळ व ती परिस्थिती पुन्हा एकवार जिवंत करता येण्याच्या शक्तीवर ऐतिहासिक कादंबरीचे यश अवलंबून असते. हे कार्य करतानाच ऐतिहासिक कादंबरी सिद्ध झालेली असते. इतिहासातील सामान्य माणूस विसरुन गेलेला असतो व असामान्याच्या जीवनाचे फक्त काही कंगोरेच उपलब्ध असतात. खऱ्या ऐतिहासिक कादंबरीकाराला ऐतिहासिक सत्य ही मर्यादा नसते, तर ते एक आव्हानाच असते. शेवक्षटी सामाजिक कादंबरीलासुद्धा शक्यता व संभवनियतेच्या ज्या मर्यादा असतात त्याचा अंतिम आधार सत्य हाच असतो. व ती काही मर्यादा नसते. इतिहास जे ऐतिहासिक सत्य नोंदवितो ती एका व्यक्तिच्या एकसंध जीवनातील काही टिंबे असतसात. ज्यावेळी आकलन त्या पातळीवर चढते त्यावेळी ही टिंबे एका सलग व्यक्तिरेखेत स्वाभाविक होऊन जात असतात. 'मैल' शब्द न वापरता 'कोस' हा शब्द वापरावा लागतो. किती वाजले? हे न विचारता किती प्रहर झाले हे विचारावे लागते. याबाबी तपशिलाच्या व तुलनेने गौण आहेत. त्यांच्यावर लक्ष केंद्रित करून मुळ प्रश्न दुर्लक्षित करण्यात काही अर्थ नाही.

'घाशीराम कोतवाल' नावापुरता ऐतिहासिक आहे तर त्याच्या नेमका उलट रा. भि. गुंजीकर यांचा ' मोचनगड' हा नावापुरताच काल्पनिक आहे.[६] मोचनगडचा नायक गणपतराव आपला जोडीदार भगवंतरावासह दोन वर्षे तुरुंगात खितपत पडला होता. ते दोघे भिंत फोडून बाहेर पडले. नंतर गंगुबाई ज्या घरात उतरली होती त्या घरापुढे गणपतराव बैरागी म्हणुन आला व त्याने आपली ओळख गंगूबाईला पटवून दिली. परंतु शामजी रांगडे जामगांव मध्ये गणपतरावाचा शोध घेण्यासाठी आला आहे हे समजताच गणपतराव व गंगुबाई या उभयतांना जामगांव सोडावे लागले. त्यानंतर गंगूबाईला

ठाणेदाराच्या घरी नेण्यात आले व गणपतराव संकटात सापडले. शेवटी शिवाजी महाराजांनी किल्ला घेतल्यावर चौकशी होऊन या उभयतांचा जीवनक्रम सुखी झाला. ही लहानशी कथा सांगताना गुंजीकरांनी प्रत्यक्ष्यात शिवाजी महाराजांना फार उशीरा कथानकात गोवले आहे. कथेचा बहुतेक भाग गणपतराव व गंगूबाई यांच्यावरील संकटांनी व्यापला आहे. त्यात दुष्ट वासना धारण करणारा सखाजीराव शिलेदार मारे प्रथमत: त्याचा सहाय्यक होवून नंतर पश्चात्ताप पावलेली कोयना मोलकरीण आहे. सटवाजीरावाची फटफजिती करून गणोबाला व गंगुबाईला हरतऱ्हेने उपयोगी पडणारा पोऱ्या दौलत्या आहे. त्यांची ही कथा वाचताना अनेक वेळा हरिभाऊ आपट्यांच्या नंतरच्या काळात गाजलेल्या 'उष:काल' कादंबरीचीही आठवण होते. गणोबा, नानासाहेब, गंगुबाई, चंद्राबाई, दौलत्या, सावळ्या इ. पात्रयोजनांचे व काही प्रसंगाचेही साम्य वाटते.

गुंजीकरांनी आपल्या लिखाणाला 'कल्पित गोष्ट' म्हंटले, कादंबरी म्हंटले नाही. परंतु ही 'कल्पित गोष्ट' केवळ कादंबरीच नव्हे तर 'ऐतिहासिक कादंबरी' या नावाला साजेशी आहे. अ. का. प्रियोळकरांनी म्हंटल्याप्रमाणे 'मोचनगड' हा ऐतिहासिक कादंबरीचा एक उत्कृष्ठ आदर्श आहे.[७] गुंजीकरांना कादंबरीच्या उदिष्टाविषयी स्पष्ट कल्पना होती आणि विश्वासराव या कादंबरीवरील परिक्षसणात गुंजीकरांचे विचार काय होते हे कळून येतात. गुंजीकर लिहतात, 'कल्पित गोष्ट' लिहणाऱ्याचा उद्देश लोकांच्या रितीभाती, त्यांची धर्मसंबंधी मते, राज्यप्रकरणी अभिप्राय, त्यांचे पोषाख, लढाईच्या रिती, त्यांच्या विचारसरणी वगैरेंचे वर्णन करण्याचा असला पाहिजे, ती केव्हाचीही असोत, त्यावेळची किंवा पुर्वीच्या वेळची तसेच या गोष्टीच्या स्थळाचे वर्णन केले पाहिजे. मनुष्याचा स्वभाव सांदीकोंदीतून शोधला पाहिजे. सारांश कवि (कादंबरीकार) हा एक इतिहासकारच आहे. एका मोठ्या मनुष्याने म्हंटले आहे की, 'आम्हांस जे काही अगोदरच माहित आहे त्यास रंग व ठाकटिकपणा देऊन मनावर नीट उठविणे हा कल्पित कादंबरीचा उद्देश' आता जर कदाचित ती कल्पित गोष्ट आमच्या अनुभवाच्या उलट असे स्वभाव व गोष्ट घडवील तर त्यापासून माहिती गहन न करता ती गोष्ट असंभवनीय नाही, उलट मतांवरुन तिची आपण पारख करतो....यावरून दिसेल की कल्पित गोष्ठ म्हणजे पृथ्वीच्या राहटीची नक्कल किंवा अनुकरण आहे. ती जर आम्हास इतिहासावरून माहित अशा गोष्टीच्या फरम्याची असली तर तीस चांगली असे आम्ही म्हंणतो. तात्पर्य - 'रचलेल्या गोष्टीत बीज जवळ असून वृक्षाचा शोध करतात व वृक्षापासुन बीज शोधून काढण्याकडे वळतात.'

गुंजीकरांनी रंगोपंत ठाणेदार, शामजी रांगडे इ. 'मोचनगड' कादंबरीतील सर्व मुख्य पात्रे काल्पनिक घेतली आहेत. काही ठिकाणी तानाजी किंवा बाजी पासलकर यांचा निर्देश व शेवटी महाराजांचे दर्शन एवढीच प्रत्यक्षपणे ऐतिहासिक पात्रे वापरली आहेत. 'मोचनगड', दाजीपूर एवढेच नव्हे तर 'मोचनगड' हे नांवसुद्धा काल्पनिक घेतले आहे. 'मोचनगड' हे किल्ल्याचे नाव काल्पनिक आहे. परंतु कादंबरीतील वर्णनावरुन हा किल्ला सह्याद्रिच्या शिखरावर कर्नाटक व महाराष्ट्र यांच्या सीमाप्रांतावर कुठेतरी बेळगांव धारवाडच्या आसपास असावा अशी कल्पना होते. खानापूरच्या नैऋत्य दिशेला 'भिमगड' म्हणून जो डोंगरी किल्ला आहे. तोच गुंजीकरांच्या दृष्टीपुढें असावा. पण सत्यसृष्टीतील गडाचे नांव न दिल्यास ऐतिहासिक सत्याशी प्रतारणा होईल म्हणून त्यांनी भिमगड असें नांव न देता 'मोचनगड' असे काल्पनिक नांव दिले आहे. तसेच 'मोचनगड' या कादंबरीच्या कथानकाचा काल सिंहगड घेण्याच्या अगोदरचा असला पाहिजे. असे अंत:प्रमाणावरून दिसून येते. 'शिवाजी महाराजांची स्वारी कर्नाटकात जाण्याकरिता निघाली आहे. या मार्गाने जाणार, उद्या स्वारीचा मुक्काम मोचनगड खाली होंणार...... मी आत्ताच येथून निघतो, आणि स्वरीला बरोबर तलास घेऊन आमच्या तान्हाजीराव मालुसऱ्यांची गाठ घेतो' असे बाळाजी म्हणतो. (पृ. ४९) यावरुन हा प्रसंग तानाजीच्या हयातीत झाला असला पाहिजे, हे उघडच दिसून येणारे आहे. शिवाजीची कर्नाटकातील जी सुप्रसिद्ध स्वारी झाली. तिचा काल १६७७ हा आहे. तेव्हा मोचनगड कादंबरीत वर्णन केलेले हे कर्नाटकातील शिवाजींचे गमन याआधीचे असले पाहिजे. हे उघड आहे. कारण सिंहगड घेताना तानाजी कामास आला व हा प्रसंग ता. ४ फेब्रुवारी १६७० मध्ये घडला. शिवाय १६७७ साली शिवाजीचा स्वराज्यसूर्य मध्यान्ही तळपत होता. पण गुंजीकरांनी ह्या काळाचे वर्णन आपल्या कादंबरीच्या सुरवातीलाच निराळ्या प्रकाराने दिले आहे. ते असे, 'हिंदूस्थानमध्यें मोंगलाई राज्याचा शिखर होंवुन चैनी व बडेंजाव यामध्ये त्यांचे दिवस चालले होते, दक्षिणेत विजापूरचें राज्यही आपणास शत्रुपासून भिण्याचे फारसे कारण नाही असे समजून राज्यव्यवस्थेमध्ये जितक्यास तितका सरासरी बंदोबस्त ठेवून बेफिकिरी पडले होते. आणि हिंदूंच्या घामाने उत्पन्न झालेल्या संपत्तीवर या परकी लोकांची याप्रमाणे मिजास चाललीं असतां नुकतेच कोठे मराठे म्हणून कोणी आहेत असे त्यास वाटू लागले होते' ही जी 'राज्यपरिस्थिती' वर्णन केली आहे, तिच्यावरुन आपणाला त्या कालाची कल्पना होईल. नेताजी पालकर याला १८६७ च्या फेब्रुवारीत औरंगजेबाने मुसलेमानी धर्माची दीक्षा दिली. यावरूनही याच्याही मागे कथानकाचा काल न्यावा लागतो.



SHIVAJI UNIVERSITY

याबरोबरच गुंजीकरांनी जुन्या चालीरितींचेही वर्णन अगदी सुक्ष्मपणे केले आहे. तसेच राज्य प्रकरणी काही अभिप्रायही आपल्या कादंबरीत दिले आहेत. उदा. पाटीलबुवांना गडावरुन शिपायाने आणलेले पहा त याप्रमाणे

श्री

राज्यमान्य राजश्री रंगो नरहर ठाणेदार

किल्ले मोचनगड

ताहा मोकदमानीहाय मौजे जामगांव सूरसन तिस्सा आबैन वअदल्लफ अवलसाल. गणोबा विनायक वगैरे कैदी पिंजऱ्यातुन फरारी झाल्याचे जाणोन, तुम्हांस लिहण्यात येतें जें - गणोबाची बायको जामगांवी आहे तिजवर चांगला बंदोबस्त ठेवावा व इसम मजकुरांचा गांवगन्नानिहाय पत्ता ठेवून पकडण्याची तजवीज करावी. जाणीजे छ १८ माहे८

(मोर्तब)

वातावरण निर्मिती सुद्धा गुंजीकरांनी अगदी चांगल्या प्रकारे केली आहे. गणोबा व भगवंतराव ज्यावेळेस भिंत फोडून येतात व त्यांना कड्यावरून खाली उडी घेण्याचा प्रसंग आणि त्यावेळेस गुंजीकरांनी केलेली वातावरण निर्मिती हे अगदी ऐतिहासिक कादंबरीला शोभेल असेच आहे. पंचवीस सत्तावीशीच्या आजमासातील दोन पुरूष, दोघेही देखणे, बांधा विशाळ, परंतु तोंड उतरलेली तथापि त्यांच्या मुद्रेवरून ते मोठ्या कुळातील पुरुष असावेत असा सहज भास होत होता. अंगावर पाहिले तर नेसायचा एक जाडा पंचा, एक जुनी बंडी आणि डोक्याला दुसरा एक पंचा. तीही मलीन होती आणि त्याला सत्तावीस ठिगळे लावली होती. हजामत वीत-वीतभर वाढलेली दोघांचेही पाय जबरदस्त बिड्यांनी खिळलेले. त्यांचा आवाज ऐकू येऊ नये म्हणून फारच जपून पण लगबगीने पावले टाकीत ते शिकरावरील एका पाहडी किल्ल्याच्या पश्चिमेकडील तराच्या आतल्या अंगाला येऊन पोहचले. त्या दोघांमध्ये पुढे जो होता, तो फार हलक्या आवाजाने बोलू लागला. म्हणाला, 'अहा भगवंता! सर्व सृष्टीचा सांभाळकर्ता तूं आहेस.. तूजवाचून आम्हाला दूसऱ्या कोणाचा आधार! तूझ्या इच्छेच्या आड येण्याची कोणाची प्राज्ञा! असे असता आम्हा निरपराध प्राण्याकडून विनाकारण काय म्हणून बरे तूं अशी ही दु:खे भोगवीत आहेस?....' इतके म्हणून त्याने मोठा सुसकारा सोडिला, आणि मागे फिरून पाहतो तो आपला सोबती नाही! असे समजल्याबरोबर धाडकन त्याच्या छातीत धडका बसला, आणि तऱ्हेतऱ्हेचे विचार मनात येऊ लागले.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR
...BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

म्हणतो,'घात झाला .... हा पळाला हे तर खचीत. बरं पळून तरी जाईल कोठे? जीवाच्या भीतीने हा पळाला आहे यात संशय नाही' त्यापक्षी कोठे तरी झाडीत हा लपून बसणार. किल्ल्याच्या बाहेर जायला याला वाटच नाही'.... आणि लपून राहिला तरी सूर्य उगवला आणि तुरूंगाचे भोळ गडकऱ्यांना दिसले की एका क्षणात याला पकडणार. तसाच जावून कोणी पाहण्यापूर्वी तुरूंगात जाऊन बसला तर बरे. पण तो तिकडेही गेला नाही. शेवटी त्याने दोन हाका मारल्या व तो आठदहा पावले पुढे गेला. तो जवळच डाव्या बाजुला मोठ्या एका वडाच्या वृक्षाखाली पायथ्यामध्ये मनुष्यासारखी काही आकृती त्याच्या दृष्टीस पडली तेव्हा गणोबा पुढे-पुढे जाऊ लागला. तशी त्याची छाती धडधड करू लागली. त्याला वाटले, आपला पत्ता काढण्याकरिताच हा कोणी येऊन बसला आहे, पण पुन्हा मनात येई की, हा भगवंतरावच असेल. पाच-सात हाताच्या अंतरावर जाऊन त्याने हाक मारली पण कोणी बोलत नाही. तेव्हा हा भगवंतराव नव्हे असा तर्क करून लाकडांचा दांडका समोर उगारून कोण आहे? म्हणून दरडावून एकदम त्याच्या अंगावर गेला.

त्याबरोबर 'हं हं हं हं! मी, तो, गणोबा, मारू नका' असा घाबऱ्या घाबऱ्या तिकडून ध्वनी उठला.

'चूप, ओरडू नको, मारीन, कोण रे तो? भगवंतराव?

'होय, मीच' म्हणून त्याने कांपत-कांपत उत्तर दिले. पटकन त्याचा हात धरुन उभा केला व गणोबा म्हणाला,'काय रे, भिऊन पळत होतास का?' तेव्हा तो म्हणाला, 'नाही, भ्यालो नाही, पण तो क डा पाहिल्याबरोबरच माझे डोळे गरगर फिरु लागले आणि मनात म्हणतो 'मी याला भिंत फोडण्याची कोठची बुद्धि सुचविली' काही केल्याने भगवंतराव उठेना म्हणून गणोबाने दोघांच्या ही डोक्याचे पंचे काढले व त्या पट्ट्यांनी भगवंतरावांना आपल्या पाठीवर आवळून बांधले आणि परमेश्वर, जलदेवता, स्थलदेवता, आकाशदेवता या सर्वांस वंदन करून कड्याच्या अगदी काठावर येऊन पोहचला. पुन: परमेश्वराला नमन करून त्या सर्व सोंगांसह प्रचंड उड्डान केले. त्या बरोबर दिशा धुंद झाल्या आणि विद्युलतेच्या गर्जनेप्रमाणे धडधड असा भयंकर ध्वनी व त्यापासून पुन: प्रतिध्वनी झाला. अशा प्रकारे साधा एक प्रसंग. गणोबा व भगवंतराव तुरुंगातून पळून येऊन कड्यावरून उडी घेतात हा. परंतु गुंजीकरांनी वातावरण निर्मितीतून हा प्रसंग चक्क वाचकांच्या डोळयासमोर उभा केला आहे.

थोडक्यात गुंजीकरांनी पात्रे, प्रसंग व स्थळ काल्पनिक घेऊन जून्या चालीरिती व वातावरण

यांच्या साह्याने ऐतिहासिक सत्याभास निर्माण करुन, 'मोचनगड' ह्या एका उत्कृष्ट ऐतिहासिक कादंबरीचा आदर्श घालून दिला आहे. पाश्चात्य साहित्यातील ऐतिहासिक कादंबरीवरील विचारदेखील याच पद्धतीचे आहेत. स्कॉटच्या आधीच्या तथाकथित ऐतिहासिक कादंबरीकरांनी ऐतिहासिक कादंबरीतील मुख्य पात्रे ऐतिहासिक नसावीत हे सूत्र पाळले नाही व अखेर त्यांना आपल्या अज्ञानाचा व साहसाचा भूर्दंड द्यावा लागला असे वॉल्टर रॅले यांनी म्हंटले आहे. तसेच इतिहास व ऐतिहासिक कादंबरी यांच्यातील साम्यभेदाचे दिग्दर्शन करताना ट्रिव्हलियनने म्हंटले, की ऐतिहासिक कादंबरीत भूतकाळातील खऱ्या घटनांचे निरूपण अपवादात्मकच असते. त्यामध्ये ऐतिहासिक घटितांचे अनुकरण करून नैसर्गिक जीवनातील वैचित्र्य व समृद्धि यांनी नटलेल्या प्रातिनिधिक कथांच्या निर्मितीचा प्रयत्न केला जातो. या सत्याभासाच्या निर्मितीसाठी व्यासंगाबरोबर वर्णित कालाशी सहानुभूती अवश्य असते. गुंजीकरांजवळ ही सर्व सामग्री होती व त्यामुळे त्यांनी आपल्या पहिल्याच कृतीत ऐतिहासिक कादंबरीचा आदर्श घालून दिला. त्यांच्यानंतर हरी नारायणांनी हाच कित्ता गिरवला व त्याला अधिक भारदारपणा व विशालता प्राप्त करून दिली.

ऐतिहासिक कादंबरी लेखनाच्या तंत्रासंबंधी गुंजीकरांनी बराच विचार केला असावा असे दिसून येईल. दंभहारककर्ता म्हणतो....''मोचनगड'कर्त्याने आपल्या पुस्तकात हलकट लोकांच्या भाषा हलकट ...घातल्या नाहीत. कारण आम्ही असे ऐकले आहे कीं त्याला मराठी भाषेचे अनेक अंतर्गत प्रकार चांगले माहित आहेत व या विषयाचे स्पष्टीकरण करण्याकरितां त्याने एल्फिन्स्तन कॉलेजांत असताना एक चांगला निबंध लिहून नेमलेले बक्षिसही मिळविलें आहे...''

'आता शिवाजीविषयी जे मोचनगडमध्ये वर्णन लिहले आहे ते खोटें म्हणण्यांस, त्याची उंचीखेरीज करुन दूसऱ्या कोणत्याही गोष्टीमध्ये मराठ्यांच्या इतिहासाला मेळ पडत नाही असे दिसत नाही. त्यांच्या पागा, मावळे लोक, पोषाख वगैरे सर्व गोष्टी बरोबर जमतात. त्यापक्षी त्यांच्या उंचीविषयीही त्याने काही योग्य आधारावाचून लिहले नसावे असे वाटते.

काल्पनिक घटनांच्या निवेदनाने ऐतिहासिक सत्याला धक्का न लागावा या दृष्टीने टीकाकारांनी एक पर्याय सुचविला आहे व अनेक विख्यात कादंबरीकारांनी त्याचा अवलंबही केला आहे. हा पर्याय म्हणजे ऐतिहासिक कादंबरीत वातावरण निर्मितीवर भर देऊन ऐतिहासिक दृष्टीने दुय्यम महत्वाच्या किंवा काल्पनिक व्यक्तींना कादंबरीत केंद्रस्थान देऊन कथानकाची रचना करणे हा होय.[९] आणि गुंजीकरांनीही 'मोचनगड' मध्येही ह्याच पर्यायाचा वापर केला आहे. त्यामुळे निर्भेळ इतिहासाच्या

पुरस्कर्त्यांच्या आक्षेपांना जागा रहात नाही व ऐतिहासिक व्यक्तींबद्दल अथवा घटनांबद्दल अपसमज प्रसृत होण्याची भिती राहत नाही. आणि ऐतिहासिक व्यक्तींचा निर्देश झाल्याने ऐतिहासिक वातावरण निर्मितीस मदत होतेच. स्कॉट, बंकिम किंवा हरिभाऊ या लेखकांनी हाच मार्ग अवलंबिलेला दिसतो. स्कॉटच्या 'केनिलवर्थ' या कादंबरीची नायिका राणी एलिझाबेथ नसून ॲमि रॉबर्टस ही आहे. हीच गोष्ट त्याच्या क्लिंटन डरवर्ड', 'आयव्हन हो' आदी लोकप्रिय कादंबरीतही आढळते.

मोचनगडाविषयी बोलण्याची वेळ म्हणजे नेहमी गुंजीकरांना उपलब्ध असणाऱ्या ऐतिहासिक सामग्रीचा उल्लेख केला जातो. 'काव्यतिहाससंग्रह' ला इ. सन. १८७८ च्या नंतर आरंभ झाला म्हणून गुंजीकरांना बखर वांङ:मयसुद्धा फारसे उपलब्ध नव्हते. ही गोष्ट आवर्जून सांगितली जाते. जणू असे साधनसाहित्य उपलब्ध असते तर गुंजीकरांनी 'मोचनगड' आहे. यापेक्षा निराळ्यारितीने लिहली असती. बखरीही उपलब्ध नव्हत्या. फक्त ग्रॅट डफचा इतिहास गुंजीकरांना उपलब्ध होता. ऐतिहासिक कादंबरीचा मराठीतला हा पहिलाच प्रयोग असल्यामुळें आणि तो यशस्वी करण्याकरिता आवश्यक असलेले इतिहासाचे ज्ञानही त्यावेळी तुटपुंजे असल्यामूळे तो प्रयोग बराच सदोष झाला आहे. कसा का होईना एकदा पायंडा पडल्यानंतर ऐतिहासिक कादंबऱ्यांची निर्मिती हळू हळू वाढू लागली. पुर्वइतिहासाविषयीच्या आस्थेने प्रस्फुरित होवून व त्या काळाविषयी फारच थोडी माहिती उपलब्ध असूनही त्यातील वातावरणासी समरस होवून गुंजीकरांनी मोचनगड ही कादंबरी लिहली. अशाप्रकारे 'मोचनगड' च्या स्वरूपाचा विचार केल्यानंतर त्याच्या मर्यादांचाही विचार करावा लागतो.

बखरी उपलब्ध नसल्या तरी ग्रॅंट डफचा इतिहास गुंजीकरांना उपलब्ध होता आणि कोणत्याही बखरीपेक्षा इतिहासाला ग्रॅंट डफ जास्त प्रामाणिक होता. त्याने निरनिराळ्या घटनांचे स्थळकाळ पुरविले होते. व्यक्तिंच्या विषयीही स्थूल कल्पना दिलेली होती. असे कुरूंदकर म्हणतात. निदान ग्रॅंट डफ वाचून इतके कळू शकले असते की ज्यावेळी शिवाजी कर्नाटक दिग्विजयाला निघाला होता त्यावेळी त्यांच्याबरोबर नेताजी पालकर, बाजी पासलकर, मोरोपंत पिंगळे आदी मंडळी नव्हती व त्यांच्या फौजा कित्येक हजारांच्या प्रचंड सामर्थ्याखाली फौजा होत्या. ४०० पायदळ, १५० घोडा व बाजारभुणगा घेऊन निघालेला तो आरंभीच्या काळातला शिवाजी नव्हता. गुंजीकरांच्या पूर्वी किर्तने यांनी थोरले माधवराव पेशवे हे नाटक इ. स. १८६१ ला लिहले होते. इ. स. १८७१ ला घाटे यांनी 'अफजलखान वध' चे नाटक लिहले होते. नाशिककरांची 'झाशीची राणी' ही नाटिका या पूर्वीची होती. फुंटे यांचे 'राजा शिवाजी' हें खंडकाव्य इ. सन. १८६९ ला प्रकाशित झाले होते व ते गुंजीकरांच्या

पाहण्यात होते. शिवाजीच्या फौजांसाठी लिहलेले-

'करूनि चढाव, करूनि चढाव,
चढाव चढाव, करूनि चढाव,
शिवाजीराव, हिंदूंचा भाव,
गाजल नांव, गांवोगांव,
चढाव, चढाव, चढाव, चढाव,
करूया चढाव, चढाव, चढाव, चढाव.'

हे जे कूचगीत गुंजीकरांनी घेतले आहे त्याची प्रेरणा 'राजा शिवाजी' या खंडकाव्यात शोधता येते. साधनाची अनुलब्धी हे 'मोचनगड' च्या स्वरूपाचे करण नव्हे आणि दूसरे म्हणजे काल्पनिक पात्रे व प्रसंग हा खरा आक्षेप नाही. देशाभिमानाचा खरा खोटा असा कोणताही आवेग या कादंबरीत नाही. निदान प्रेरणा देण्याचा आभास निर्माण करण्याची धडपड करावी तीही गुंजीकरांनी केलेली नाही. या कादंबरीचा नायक गणपतराव यांच्यावर संकटे कोसळतात. कारण तो शिवाजीला मदत करीत होता असे या कादंबरीचे कथानक नाही. तेथे मुळात मराठ्यांची राज्यनिर्मिती विरोधी मुसलमानांचा राज्य टिकवण्याचा प्रयत्न हा झगडाच नाही. खरे म्हणजे 'मोचनगड' ही इतिहासाला काल्पनिकाची जोड देणारी कादंबरी नव्हे. ती काल्पनिकाला इतिहासाची जोड देणारी व्याज ऐतिहासिक कादंबरी आहे.[१०] हरिभाऊंच्या नंतरच्या काळात सरस सुरस ग्रंथमालांनी इच्छेनूसार युरोपिय कादंबऱ्यांची कथानके घेतली व त्यांना इतिहासात नेऊन बसविला. प्रा. फडके यांची 'अल्ला हो अकबर' ही कादंबरी अशीच आहे. अशा व्याज ऐतिहासिक कादंबरीचा नमुना म्हणूनच 'मोचनगड' कडे पहावे लागते.

इ. स. १८७० पासूनची २५ वर्षे मुक्तामाला व मंजुषाला याच लोकप्रियतेच्या शिखरावर असणाऱ्या कादंबऱ्या होत्या. यानंतर हरिभाऊंच्या उष:काल कादंबरीने ही जागा घेतली. 'मोचनगड' वाचकांच्या मनाची फारशी पकड घेऊ शकले नाही याचे कारण काय असावे हाही एक विचार करण्याजोगा प्रश्न आहे. रंजनात्मकता हे सूत्र सांभाळून शिवाय 'मोचनगड' देशाभिमानाला थोडी फुंकर घालू शकली असती व वाचकांना सुखवू शकली असती पण तसे घडलेले दिसत नाही. हे न घडण्याचे कारण म्हणजे मोचनगडची गती कमालीची संथ आहे.[११] आणि रंजनवादी कादंबरीला ही



SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

संथ गती चालत नाही. कारण संथ गतीतील कादंबरी संकटे व सुटका यांची साखळी गुंफू शकत नाही. ज्या सज्जनांच्यावर संकटे यावयाची त्या सज्जनांचे सुखी व आनंदी जीवन आधी दाखवून मग संकटांना आरंभ करावा लागतो. 'मोचनगड' मधील गणपतराव व गंगुबाई यांच्या जीवनातील सुखी कालखंड गुंजीकरांनी सोडूनच दिला आहे. गणपतराव कड्यावरून खाली उडी घेतो. येथूनच कादंबरी सुरू होते आणि तरीही वाचतो हे अद्‌भूत मुक्तामालेपेक्षा मंजुघोषेला जवळ असणारे आहे म्हणजे ही कादंबरी सुखावर संकट अशी सुरू न होता संकटातुन सुटका अशी सुरू होते. आता यानंतर पुन्हा संकटाचा प्रारंभ ज्यावेळी गणपतराव पकडला जातो त्यावेळी होणार! येथेपर्यंत येतानाच कादंबरी निम्म्याहून अधिक संपलेली आहे. उत्तरार्धातील चार प्रकरणे तर केवळ एका रात्रीची हकीकत सांगतात. तीही गरजेहून अधिक योगायोग गृहीत धरणारी आहे. हा कथानकाचा संथपणा व त्याला कोणतेही केंद्र नसणे मोचनगडच्या विरोधी गेलेले दिसते. मुक्तामालेच्या मानाने तिची रचनाही विस्कळीत आहे. मुख्य कथानकाशी गौण पात्रांचा संबधच येत नाही. म्हणजे तंत्रदृष्ट्या एका रंजनवादी कादंबरी यादृष्टीने तिची मांडणीच हुकलेली आहे.

इंग्रजी वाङ्मय वाचून गुंजीकर यांना 'मोचनगड' ही कादंबरी लिहण्याला प्रेरणा मिळाली. परंतु स्कॉट च्या कादंबरी लेखनापासून प्रेरणा घेऊन निर्माण झालेली कादंबरी खऱ्या अर्थाने ऐतिहासिक होणेच शक्य नव्हते. तसाच हा प्रकार आहे. वर्तमानकाळातील नावे गावे घेऊनही साहस कथा लिहता येते. ऐतिहासिकाचा आभास निर्माण करूनही तीच कथा लिहता येतें. पून्हा एकवार पापभिरु व सज्जन किंवा ध्येयवादी व सज्जन स्त्रीपुरूषांवरील संकटे, साहसे व सुटका यांनी भरलेली अनपेक्षित योगायोगांना जागा देणारी भुयारे, तळघरे, कारस्थाने यांना वाव देवून शेवटी सुखान्त होणारी रंजनात्मक कादंबरीच या उद्योगातून निर्माण होणे शक्य होते. तसे मोचनगडचे झालेले आहे. मोचनगड ही कोणती नवी परंपरा सुरुवात करणारी कादंबरी नाही. ती मुक्तामालेच्या परंपरेतील तिच्यातील काही तांत्रिक अंगाचा विकास करणारी व रंजनदृष्ट्या तिच्याहीपेक्षा कमी असणारी अशी कादंबरी आहे.[१२]

---



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
UNIVERSITY KOLHAPUR

## संदर्भ टीपा


१. प्र. न.जोशी (मराठी वाङमयाचा विवेचक इतिहास) प्रसाद प्रकाशन, १८९२, सदाशिव पेठ, पुणे ३०, प्रथमावृत्ती जानेवारी १९७२, पृष्ठ क्रमांक - ३१९.

२. कुसुमावती देशपांडे (मराठी कादंबरी) मुंबई, मराठी साहित्यसंघ, प्रथमावृत्ती २० जुलै १९५३, पृष्ठ क्रमांक - ४१.

३. कुसुमावती देशपांडे (मराठी कादंबरी) मुंबई मराठी साहित्य संघ, प्रथमावृत्ती २० जुलै १९५३, पृष्ठ क्रमांक - ४२.

४. बापट गोडबोले (मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास) व्हीनस प्रकाशन, पुणे. तिसरी आवृत्ती सप्टेंबर १९७३, पृष्ठ क्रमांक - १५०.

५. नरहर कुरुंदकर (धार आणि काठ) देशमुख आणि कंपनी, पुणे. पहिली आवृत्ती २७ एप्रिल १९७१, पृष्ठ क्रमांक - ३७.

६. रा. श्री. जोग (मराठी वाङमयाचा इतिहान खंड - चौथा) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, दुसरी आववृी, पृष्ठ क्रमांक - २२३.

७. कुसुमावती देशपांडे (मराठी कादंबरीचे पहिले शतक) मराठी साहित्य संघ प्रकाशन, दुसरी आवृत्ती १९७५, पृष्ठ क्रमांक - ३७३.

८. रा. भि. गुंजीकर (मोचनगड) व्हीनस प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, पृष्ठ क्रमाकं - १३.

९. बापट गोडबोले (मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास) व्हीसन प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती सप्टेंबर १९७३, पृष्ठ - १५५.

१०. नरहर कुरुंदकर (धार आणि काढ) देशमुख आणि कंपनी, पुणे, पहिली आवृत्ती २७ एप्रिल १९७१, पृष्ठ - ४०.

११. नरहर कुरुंदकर (धार आणि काठ) देशमुख आणि कंपनी, पुणे पहिली आवृत्ती २७ एप्रिल १९७१, पृष्ठ - ४१.

१२. नरहर कुरुंदकर (धार आणि काठ) देशमुख आणि कंपनी पुणे, पहिली आवृत्ती २७ एप्रिल १९७१, पृष्ठ ३९.